**महत्वाचे**

**जा.क्रं.उमाशि-१/पुवि/इ.११वी कें.प्रवेश/२०१३**
**शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,**
**पुणे १ यांचे कार्यालय**
**दिनांक : - ११/७/२०१३**

**प्रति,**

**प्राचार्य / मुख्याध्यापक**
**सर्व कनिष्ठ महाविद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय, पुणे**

**विषय : <u>इ. ११ वी केंद्रीय प्रवेश २०१३-१४</u>**
**दिनांक १५/७/२०१३ रोजी प्राचार्य सहविचार सभा**

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, सन २०१३-१४ मध्ये कनिष्ठ महाविद्यालय विद्यार्थी प्रवेश दिनांक १६/७/२०१३ ते १९/७/२०१३ दरम्यान होणार आहेत यांची आपणास कल्पना आहेच.

प्रवेशाचे नियोजन व सनियंत्रण सुरळितीपणे होणे संदर्भात सर्व कनिष्ठ महाविद्यालय प्राचार्यांची सहविचार सभा दिनांक १५/७/२०१३ रोजी दुपारी ३.०० वाजता **स्थळः** आबासाहेब गरवारे महाविद्यालयामध्ये **'असेंब्ली हॉल'** कर्वेरोड, पुणे येथे आयोजित करण्यात आलेली आहे. सदर सभेस आपण स्वतः प्राचार्य व एक सहाय्यकासह दुपारी २.४५ वाजता उपस्थित रहावे.

सभा संपल्यानंतर त्याच ठिकाणी विभागावार कॉलेजनिहाय प्रवेश यादयांचे वाटप करण्यात येणार आहे. सदर यादया ताब्यात घेऊन त्याच दिवशी संध्याकाळी ६.०० वाजेपर्यंत आपल्या कनिष्ठ महाविद्यालयामध्ये लावाव्यात.

सदर परिपत्रक या कार्यालयाच्या (**www.dydepune.com**) या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहे.

**(सुमन शिंदे)**
**शिक्षण उपसंचालक,**
**पुणे विभाग, पुणे १**

प्रत - माहितीसाठी व कार्यवाहीसाठी
प्राचार्य, आबासाहेब गरवारे महाविदयालय, कर्वेरोड, पुणे
२/- उपरोक्त सहविचार सभेची व्यवस्था आपल्या स्तरावर करावी.